माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०२४/२०१७-१८
दि.१६/०२/२०१८.

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री.संतोष कुमार तिवारी, ................अपिलार्थी
सी ०४, न्यु मिरा पैराडाईज,
गिता नगर, जुन्या पेट्रोल पंप मागे,
मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे.४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-व्यवस्थापक (परिवहन)

## -: <u>विवेचन</u> :-

श्री.संतोष कुमार तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांचेकडे दि.०४/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

क. मिरा भायंदर नगरपालिका को जेएनएनआरयु एम (Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission) द्वारा मिली रकम का कार्य तथा वर्षानुसार रुपयो का विवरण प्रदान करे।

ख. यह रकम किस किस मद मे कितने रुपये खर्च किये गये विवरण प्रदान करे।

ग. तय रकम से कितने रुपयो का अधिक रकम कार्य योजनाओ मे मिरा भायंदर नगरपालिका के गलतीया या लापरवाही से बढाया गया है प्रत्येक का विवरण प्रदान करे।

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी व उप-व्यवस्थापक (परिवहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१६/०२/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.परिवहन/२२४/२०१८ दि.१४/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) हे रजेवर गेले असल्याकारणाने सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, परिवहन विभाग व अपिलार्थी अर्जदार उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.०४/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना सुधारित स्वरुपात माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, परिवहन विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास आज रोजी हस्ते माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपुर्ण असुन ती सुधारित करुन १० दिवसांत विनाशुल्क देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांनी सदरचा अर्ज हा इतर विभागाशी निगडीत असल्याने, संबंधित विभागाकडे अर्ज वर्ग करुन तसे लेखी स्वरुपात अपिलार्थी अर्जदारास कळविण्यात यावे याची दक्षता घ्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

३) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.संतोष कुमार तिवारी,
सी ०४, न्यु मिरा पैराडाईज,
गिता नगर, जुन्या पेट्रोल पंप मागे,
मिरा भाईंदर रोड, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे.४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-व्यवस्थापक (परिवहन)

३) जन माहिती अधिकारी तथा
सहा.आयुक्त (सा.प्र.)

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन) यांचे कार्यालय.

भारतीय डाक
India Post